प्रकरण IV

उपकराचे निर्धारण, संकलन आणि हस्तांतरण

प्रकरण-IV

उपकराचे निर्धारण, संकलन आणि हस्तांतरण

4.1 उपकराचे निर्धारण, संकलन आणि हस्तांतरण

इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाची संसाधने वाढविण्यासाठी, भारत सरकारने इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, 1996 (उपकर अधिनियम) लागू केला (ऑगस्ट 1996) जेणेकरून नियोक्त्यांनी केलेल्या बांधकाम खर्चावर उपकर आकारण्याची आणि संकलन करण्याची तरतूद असेल. उपकर कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी भारत सरकारने इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, 1998 (उपकर नियम) अधिसूचित केले (मार्च 1998).

नियोक्त्याने केलेल्या बांधकाम अथवा इतर बांधकाम खर्चाच्या एक टक्का दराने हा उपकर आकारावयाचा होता. उपकर अधिनियमाच्या कलम 3 आणि उपकर नियमाच्या नियम 5 नुसार संकलित केलेला उपकर हा संकलन झाल्यापासून 30 दिवसांच्या आत मंडळाकडे हस्तांतरित करायला हवा. उपकर संकलन दोन प्रकारे केले जात होते (i) इमारत किंवा इतर बांधकाम कामांची देयके प्रदान करताना स्त्रोतारंभी वजावट (ii) इमारत किंवा इतर बांधकाम कामांना मंजुरी देताना स्थानिक प्राधिकरणाकडून उपकर संकलन. त्यानंतर उपकर संकलक हा उपकर मंडळाकडे जमा करतो.

उपकर अधिनियमाच्या कलम 14 मध्ये उपकर कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी नियम बनविण्याचा अधिकार केंद्र शासनाला देण्यात आला आहे. या अधिकाराचा वापर करून केंद्र शासनाने उपकर नियम लागू केले. उपकर नियमावलीतील नियम 2(एफ), 2(जी) आणि 2(एच) मध्ये राज्य शासनाकडून 'उपकर संकलक', 'निर्धारण अधिकारी' आणि 'अपीलीय प्राधिकरण' यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे**.** त्यानुसार, विभागाने एप्रिल 2008 मध्ये जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे शासकीय विभाग, सार्वजनिक उपक्रम इत्यादींसाठी पदनामानुसार विविध अधिकाऱ्यांची नेमणूक केली. उपकर संकलक, मूल्यमापन अधिकारी आणि अपीलीय अधिकारी म्हणून अधिसूचनेनुसार विविध प्रकारच्या बांधकामांसाठी नियुक्त उपकर संकलक, मूल्यमापन अधिकारी आणि अपीलीय अधिकारी **परिशिष्ट 4.1** मध्ये दिले आहेत**.**

उपकर संकलन**,** निर्धारण आणि त्याचे हस्तांतरण यांची यंत्रणा, **आलेख 4.1** मध्ये दर्शविली आहे**.**

आलेख 4.1: उपकर संकलन, निर्धारण आणि त्याचे हस्तांतरण यांची यंत्रणा



2017-18 ते 2021-22 दरम्यान मंडळाच्या बँक खात्यात ₹ 7,689.73 कोटी हस्तांतरित करण्यात आले होते. 2017-18 ते 2021-22 दरम्यान मंडळाच्या बँक खात्यात भरणा केलेली उपकराची वर्ष-निहाय रक्कम **आलेख 4.2** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 4.2: 2017-18 ते 2021-22 दरम्यान मंडळाच्या बँक खात्यात वर्ष-निहाय भरलेला उपकर



स्त्रोत : मंडळाने 2017-18 ते 2021-22 या वर्षासाठी मंजूर केलेल्या वार्षिक खात्यांमधून संकलित केलेल्या उपकराच्या वर्षनिहाय संकलनाची माहिती

4.2 उपकराची आकारणी व संकलन

उपकर अधिनियमाच्या कलम 3 (1) नुसार, भारत सरकारने अधिसूचित केले (सप्टेंबर 1996) की इमारत किंवा इतर बांधकाम अधिनियम, 1996 च्या हेतूसाठी उपकर नियोक्त्याने इमारत किंवा इतर बांधकाम कामांवर केलेल्या बांधकाम खर्चाच्या एक टक्का दराने आकारला जाईल.

उपकराची आकारणी आणि संकलनामधील त्रुटींची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.

4.2.1 उपकर संकलनासाठी बांधकाम खर्च निश्चित करणे

उपकर नियमांच्या नियम 3 नुसार, उपकर आकारणीसाठी बांधकाम खर्चात नियोक्त्याने जमिनीची किंमत आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियम, 1923 अन्वये कामगार किंवा त्याच्या नातेवाईकांना दिलेली किंवा देय असलेली कोणतीही भरपाई वगळून इमारती संदर्भात किंवा इतर बांधकाम कामासंदर्भात केलेला सर्व खर्च समाविष्ट असणे आवश्यक आहे.

4.2.1.1 *बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक क्षेत्र वगळणे*

कामगार विभागाने शासन निर्णय जारी केला (जून 2010) आणि निर्देश दिले की, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नोंदणी महानिरीक्षकांनी तयार केलेल्या वार्षिक दर विवरणाचा विचार करून बांधकामाच्या अंदाजित खर्चाची परिगणना करावी. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी-तपासणी केलेल्या 10 नियोजन प्राधिकरणांमध्ये उपकर संकलकांनी आकारावयाच्या उपकरासाठी नियोजन प्राधिकरणांनी वार्षिक दर विवरण आणि बांधकामाच्या बांधीव क्षेत्रफळाच्या[24]आधारे बिगर- चटई क्षेत्र (बिगर-चटई क्षेत्र म्हणजे जिना, उद्वाहन, तळघर इत्यादिचे क्षेत्रफळ जे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जारी केलेल्या विकास नियंत्रण नियमावली/एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार वापरल्या जाणाऱ्या चटई क्षेत्र निर्देशांकाची[25] गणना करताना विचारात घेतले जात नाही) वगळून बांधकामाचा अंदाजित खर्च निश्चित केला होता.

---

24 नगर विकास विभागाने जारी केलेल्या एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली 2020 नुसार आणि महानगरपालिका/नगरपरिषदा/प्राधिकरणांच्या नगररचना विभागांद्वारे नियंत्रित केलेले बांधकाम क्षेत्र म्हणजे कॅन्टिलिव्हर मजले, मेझनिन मजले यासह सर्व मजल्यांवर इमारतीने व्यापलेले क्षेत्र, परंतु या नियमांनुसार चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मोजणीतून विशेषतः वगळण्यात आलेले क्षेत्र वगळून.

25 चटई क्षेत्र निर्देशांक म्हणजे एकूण अनुमत बांधकाम क्षेत्र आणि एकूण भूखंड क्षेत्रफळाचे गुणोत्तर

निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी-तपासणी केलेल्या 10 नियोजन प्राधिकरणांमधील 169 बांधकाम आराखडय़ांच्या छाननीत असे निदर्शनास आले की, 57[26] प्रकरणांमध्ये चार[27] नियोजन प्राधिकरणांनी बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक वगळून केवळ बांधीव क्षेत्रफळावर वार्षिक दर लागू केले. बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक क्षेत्र वगळून बांधकामाचा अंदाजित खर्च निश्चित केल्याने **तक्ता 4.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹ 29.41 कोटी उपकराची अल्प वसुली झाली.

तक्ता 4.1: चाचणी-तपासणी केलेल्या कार्यालयांमधील उपकराची अल्प वसुली

अनु. क्र.	चाचणी-तपासणी केलेले कार्यालय	प्रकरणांची संख्या	उपकराची अल्प वसुली (₹ लाखात')
1	कुळगाव बदलापूर नगरपरिषद	1	1.31
2	बृहन्मुंबई महानगरपालिका	35	295.27
3	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण	18[28]	2,643.90
4	लोणावळा नगरपरिषद	3	0.17
	एकूण	**57**	**2,940.65**

स्त्रोत: चाचणी-तपासणी केलेल्या प्रकरणांच्या छाननीवर आधारित संकलित

ठाणे महानगरपालिकेतील एका प्रकरणात उपकर आकारणीसाठी बांधकामाचा खर्च निश्चित करताना स्टिल्ट क्षेत्राचा विचार करण्यात आला नव्हता, परिणामी ₹ 1.21 कोटीची अल्प वसुली झाली. लेखापरीक्षणाने सदर बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर (मे 2023) ठाणे महानगरपालिकेने जून 2023 मध्ये ₹ 1.21 कोटीची वसुली केली. सहायक नगर रचनाकार कुळगाव-बदलापूर महानगरपालिका यांनी नमूद केले (जून 2023) की विकासकाकडून रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही केली जात आहे. सहायक नगर रचनाकार लोणावळा महानगरपालिका यांनी नमूद केले (जुलै 2023) की लेखापरीक्षणाने निदर्शनास आणून दिलेली प्रकरणे तपासली जातील आणि वसुली केली जाईल.

26 उर्वरित 105 प्रकरणांमध्ये (ठाणे महानगरपालिकेचे एक प्रकरण व इचलकरंजीतील सहा प्रकरणे वगळून,ज्यांत कमी वसुली नव्हती) इमारतीचे आराखडे/प्रारंभ प्रमाणपत्रे ही उपकर आकारणी निश्चित करण्यासाठी बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक घटक दर्शवित नव्हते.

27 बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, लोणावळा नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगर परिषद.

28 नऊ प्रकरणांमध्ये, बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक क्षेत्र प्रारंभ प्रमाणपत्रांमध्ये दर्शविले गेले नसल्याने लेखापरीक्षणाला हे प्रकल्प ज्यांच्यामध्ये चटई क्षेत्र निर्देशांक आणि बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक यातील गुणोत्तर निश्चित करण्यासाठी एकूण बांधीव क्षेत्र (चटई क्षेत्र आणि बिगर-चटई क्षेत्र) दर्शविणाऱ्या पर्यावरण प्रभाव निर्धारण अहवालावरच अवलंबून राहावे लागले. हे गुणोत्तर लेखापरीक्षणाने उपकराच्या अल्प वसुलीच्या परिगणनासाठी इमारती आराखडे/जारी केलेली प्रारंभ प्रमाणपत्रे यामधील बिगर-चटई क्षेत्र निर्देशांकाचे मोजमाप करण्यासाठी वापरले.

4.2.1.2 *भूप्रदेश रेखाटन, चालण्याचे मार्ग, उद्याने यांच्यावरील खर्च अंतर्भूत न करणे*

- लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की भूप्रदेश रेखाटन (लँडस्केपिंग), चालण्याचे मार्ग (वॉकिंग ट्रॅक), उद्याने आदींवर होणारा खर्च, ज्यात बांधीव क्षेत्राचा समावेश नसतो, उपकर आकारणीसाठी बांधकामाचा खर्च निश्चित करताना निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील 10 पैकी एकाही नियोजन प्राधिकरणाने विचार केला नव्हता.

अशाप्रकारे, बांधकामाचा खर्च निश्चित करताना भूप्रदेश रेखाटन, चालण्याचा मार्ग, उद्याने आदींवर होणारा खर्च आणि बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक वगळल्याच्या परिणामी उपकराची अल्प वसुली झाली.

मुख्य अभियंता (विकास आराखडा), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी लेखापरीक्षण निष्कर्ष स्वीकारताना (जुलै 2023) सांगितले की, आयुक्तांनी जुलै 2023 मध्ये मंजूर केलेल्या नव्या धोरणानुसार एकूण बांधकाम क्षेत्रावर उपकर वसूल केला जाईल. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने अनुसरण केलेल्या पद्धतीनुसार उपकर वसूल केला जाईल आणि उपकर भरण्यासाठी विकासकांना कळविले जाईल.

निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी सांगितले की, बिगर-चटई क्षेत्र निर्देशांक क्षेत्रावर उपकर न आकारण्याची बाब नियोजन प्राधिकरणासमोर मांडली जाईल.

4.2.2 बांधकामाच्या प्रत्यक्ष खर्चाऐवजी बांधकामाच्या अंदाजित किंमतीवर उपकराची आकारणी

उपकर नियमांच्या नियम 7 नुसार **परिच्छेद 4.2** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, नियोजन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या बांधकामाच्या अंदाजित खर्चावर उपकर आकारला होता. बांधकामाच्या अंतिम खर्चावर उपकर आकारणे आवश्यक असल्याने कर निर्धारण अधिकाऱ्यांना बांधकामाच्या अंतिम खर्चाचे निर्धारण करून निर्धारण आदेश जारी करणे आवश्यक आहे.

उपकर नियमांच्या नियम 6 नुसार प्रत्येक नियोक्त्याने काम सुरू झाल्यापासून 30 दिवसांच्या आत प्रपत्र I मधील माहिती कर निर्धारण अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र I मध्ये काम सुरू होण्याची तारीख, कामाचा अंदाजित खर्च, भरलेल्या उपकराची रक्कम आणि कामावर असलेल्या कामगारांची संख्या याची माहिती होती. उपकर नियमांच्या नियम 7 नुसार कर निर्धारण अधिकाऱ्याने नियोक्त्याने सादर केलेल्या माहितीची छाननी करून बांधकामाची अंतिम किंमत ठरवून प्रपत्र I मधील माहिती प्राप्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीत निर्धारण करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात खालील गोष्टी निदर्शनास आल्या:

- निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी-तपासणी केलेल्या 10 महानगरपालिका/ परिषदा आणि विकास प्राधिकरण (नियोजन प्राधिकरण) मध्ये 2017-18 ते 2021-22 या कालावधीत नियोक्त्यांनी कर निर्धारण अधिकाऱ्यांकडे प्रपत्र 1

सादर केले नव्हते किंवा प्रपत्र 1 मिळविण्यासाठी या प्राधिकरणांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती.

- उपकर नियमांच्या नियम 10 मधील अधिकारानुसार जो निर्धारण अधिकाऱ्यांना इतर गोष्टींबरोबरच बांधकाम खर्चाच्या किंवा कामगारांच्या संख्येच्या निर्धारणाशी संबंधित कोणतीही विहित नोंदवही किंवा इतर कोणतेही दस्तऐवज सादर करण्याची आवश्यकता प्रतिपादित करतो, अशा बांधकामाच्या खर्चाच्या वाजवी निर्धारणासाठी अत्यंत आवश्यक मानल्या गेलेल्या अधिकारांचा वापर करून बांधकामाची किंमत निश्चित केल्यानंतर वसूल करण्यात आलेल्या उपकराचे निर्धारण करण्यातही निर्धारण अधिकारी अपयशी ठरले.
- 2017-18 ते 2021-22 या कालावधीत निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी- तपासणी केलेल्या 10 महापालिका/नगरपरिषद व विकास प्राधिकरणाने विकास नियंत्रण नियमावलीअंतर्गत विकासाची परवानगी मागणाऱ्या अर्जदारांना 34,802 प्रारंभ प्रमाणपत्रे[29] जारी केली होती. मात्र, कोणतेही निर्धारण न झाल्याने व निर्धारण आदेश जारी केल्याने बांधकामाच्या अंतिम खर्चाऐवजी बांधकामाच्या अंदाजित खर्चावर उपकर आकारला जात होता.

अशाप्रकारे, उपकर कायद्यातील तरतुदींनुसार निर्धारण आदेश जारी करण्यासाठी पावले उचलण्याची लोक लेखा समितीने 2015-16 च्या 23[व्या] अहवालात केलेली शिफारसही अंमलात आणली नाही.

उत्तरात, शासनाने सांगितले की, बांधकामाच्या अंतिम खर्चावर आधारित निर्धारण आदेश सादर न करण्यासंदर्भात सर्व संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांना पत्र जारी करण्यात आले आहे. उपकर नियमांचे पालन न करणे आणि मंडळ/विभागाकडून देखरेखीचा अभाव याकडे उत्तरात लक्ष वेधते/वेधण्यात आले आहे. निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी सांगितले की, निर्धारण आदेशांसंदर्भात लेखापरीक्षणाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा विचार केला जाईल.

4.3 उपकर हस्तांतरणासाठी तंत्र

उपकर अधिनियमाच्या कलम 3 आणि उपकर नियमांच्या नियम 5 नुसार संकलन केलेला उपकर संकलित झाल्यापासून 30 दिवसांच्या आत मंडळाकडे हस्तांतरित करावयास हवा. उपकर संकलकाला मंडळाकडे उपकर जमा करण्यापूर्वी उपकर संकलित करण्याचा खर्च राखून ठेवण्याची मुभा देण्यात आली होती. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, राज्यातील उपकर प्राधिकाऱ्यांनी म्हणजेच स्थानिक संस्था आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संकलित केलेला उपकर बँक हस्तांतरणाद्वारे

---

29 प्रारंभ प्रमाणपत्र म्हणजे विकास नियंत्रण विनियमावली अंतर्गत करावयाच्या कामांसाठी अर्जदाराला दिलेली परवानगी

मंडळाच्या संकलन खात्यात जमा केला जात होता किंवा नियोक्त्याकडून मंडळाच्या संकलन खात्यात थेट जमा केला जात होता.

4.3.1 मंडळाकडे उपकराचा भरणा करण्यातील विलंब

निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी-तपासणी केलेल्या 20 कार्यालयांमधील (10 नियोजन आणि 10 बांधकाम खर्च कार्यालये) मधील अभिलेख्यांच्या तपासणीतून असे निदर्शनास आले की 2017-18 ते 2021-22 दरम्यान संकलित केलेल्या ₹ 1,986.10 कोटी उपकरापैकी ₹ 1,965.28 कोटी मंडळाकडे जमा करण्यात आला होता. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, चाचणी-तपासणी केलेल्या 20 कार्यालयांपैकी सात कार्यालयांमध्ये **तक्ता 4.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे उपकर संकलकांकडून उपकर जमा करण्यास विलंब झाला.

तक्ता 4.2: 2017-18 ते 2021-22 दरम्यान उपकर जमा करण्यात झालेला विलंब

अ.क्र.	चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयाचे नाव	2017-18 ते 2021-22 दरम्यान संकलित रक्कम (₹ कोटींमध्ये)	2017-18 ते 2021-22 या कालावधीत मंडळाकडे जमा केलेली रक्कम (₹ कोटींमध्ये)	जमा केलेल्या एकूण रकमेपैकी भरणा करण्यास विलंब झालेली रक्कम (₹ कोटींमध्ये)	30 दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला कालावधी
1.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण	216.25	214.48	34.47	12 दिवस ते 325 दिवस विलंब
2.	कांपटी नगरपरिषद	0.26	0.26	0.12	एक महिना ते दोन वर्षांचा विलंब
3.	पुणे महानगरपालिका	542.28	536.86	536.86	दोन ते आठ महिन्यांचा विलंब
4	लोणावळा नगरपरिषद	8.06	7.99	5.35	एक ते आठ महिन्यांचा विलंब
5	ठाणे महानगरपालिका	207.55	205.48	205.50	एक ते 25 महिन्यांचा विलंब
6	सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण), कोल्हापूर	7.02	7.02	0.68	15 दिवस ते 2.5 महिन्यांचा विलंब
7	सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे	36.69	36.69	5.75	एक महिना ते सात महिन्यांचा विलंब
	एकूण	**1,018.11**	**1,008.80**	**788.73**	

तक्ता 4.2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2017-18 ते 2021-22 दरम्यान मंडळाकडे जमा केलेल्या ₹ 1,008.80 कोटीपैकी निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी-तपासणी केलेल्या सात कार्यालयांमध्ये 2017-18 ते 2021-22 दरम्यान ₹ 788.73 कोटी (78 टक्के) जमा करण्यात विलंब झाला होता.

4.3.2 मंडळाकडे उपकराचा भरणा न करणे

निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील चाचणी-तपासणी केलेल्या 20 कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या छाननीमध्ये मंडळाकडे उपकर जमा केला नसल्याचे निदर्शनास आले, जे **तक्ता 4.3** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 4.3: संकलित उपकर मंडळाकडे जमा न करणे

अ.क्र.	चाचणी-तपासणी केलेल्या कार्यालयाचे नाव	संकलन केलेल्या उपकराची रक्कम (₹ लाखात)	लेखापरीक्षण निष्कर्ष
1	कोल्हापूर महानगरपालिका	86.60	एप्रिल 2019 ते नोव्हेंबर 2022 दरम्यान संकलित ₹ 86.60 लाख उपकर जमा (डिसेंबर 2022) करण्यात आला नव्हता. लेखापरीक्षणाने निदर्शनास आणून दिल्यानंतर डिसेंबर 2022 मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेने ₹ 86.60 लाखांपैकी केवळ ₹ 23.85 लाख जमा केले होते. कोल्हापूर महानगरपालिकेच्या मुख्य लेखापालांनी सांगितले (डिसेंबर 2022) की, उर्वरित रक्कम नगर रचना विभागाशी ताळमेळ केल्यानंतर प्रदान केली जाईल.
2	इचलकरंजी महानगरपालिका	235.00	एप्रिल 2018 ते मार्च 2022 दरम्यान संकलित ₹ 2.35 कोटी उपकर जमा (डिसेंबर 2022) करण्यात आला नव्हता. लेखापरीक्षणात ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर महानगरपालिकेने मार्च 2023 मध्ये संकलन खर्चापोटी ₹ 0.02 कोटी राखून ₹ 2.33 कोटी जमा केल्याचे चलन सादर केले.
		2.24	इचलकरंजी महानगरपालिकेत नियोक्त्यांनी मंडळाच्या संकलन खात्यात रक्कम थेट जमा केल्याचे दर्शविणाऱ्या चाचणी-तपासणी केलेल्या 20 पैकी 2 चलान मध्ये ₹ 2.24 लाख मंडळाच्या संकलन खात्यात जमा झाल्याचे आढळून आले नाही. ह्यावर, इचलकरंजी महानगरपालिकेने दोन्ही पक्षांना थकित उपकराची रक्कम जमा करण्याविषयी नोटिसा जारी केल्या.तथापि, दोन्ही पक्षांकडून वसुली बाकी होती.
3	बृहन्मुंबई महानगरपालिका	43.97	चाचणी-तपासणी केलेल्या 40 पैकी सात इमारत आराखड्यांमध्ये 2017-18 ते 2021-22 दरम्यान संकलित ₹ 43.97 लाख उपकर चुकून वसुलीचा खर्च मानला गेला आणि त्यामुळे तो मंडळाकडे (डिसेंबर 2022) जमा करण्यात आला नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उप-मुख्य लेखापाल, (महसूल-3) यांनी असे सांगितले (जून 2023) की, अशा प्रकारच्या जमा न केलेल्या इतर प्रकरणांची पडताळणी केल्यानंतर ही रक्कम मंडळाकडे जमा केली जाईल.
4	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण	4.19	एका प्रकरणात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला त्यांच्या प्रसूतीगृहासाठी प्रारंभ प्रमाणपत्र जारी केले आणि ₹ 4.19 लाख उपकर भरण्याचे निर्देश दिले (सप्टेंबर 2021). मात्र, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महानगरपालिकेला देय असलेल्या थकबाकीतून उपकर समायोजित करण्याची विनंती (फेब्रुवारी 2022) महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला केली. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ही रक्कम समायोजित न करता मंडळाला उपकर भरला (डिसेंबर 2022).
		372.00	

तक्ता 4.3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 20 पैकी चार कार्यालयांनी ₹ 3.72 कोटी उपकर मंडळाच्या संकलन खात्यात जमा केला नव्हता आणि लेखापरीक्षणात ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर मंडळाकडे ₹ 3.72 कोटी पैकी ₹ 2.57 कोटी हस्तांतरित केले.

4.3.3 प्राप्त उपकराचा ताळमेळ

उपकर नियमांच्या नियम 5 मध्ये उपकर संकलकाने मंडळाकडे विहित चलनाच्या प्रपत्रासह उपकर मंडळाच्या खातेप्रमुखांकडे हस्तांतरित करावा, अशी अट घालण्यात आली होती. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, जरी बँक हस्तांतरणाच्या माध्यमातून ही रक्कम मंडळाला प्राप्त झाली होती तरी उपकर संकलकाने चलने सादर केली नव्हती. तसेच, प्रत्येक नियोक्त्याच्या देयकातून वजावट केलेल्या उपकराचा तपशील, भरणा केलेली रक्कम, भरणा केल्याची तारीख आणि चलन क्रमांक यांचा तपशील उपकर संकलकांनी मंडळाच्या संकलन खात्यात भरणा केलेल्या रकमेशी ताळमेळ घेण्यासाठी विहित नमुन्यात मंडळाकडे पाठवावा, असे निर्देश (जून 2010) विभागाने दिले होते. तसेच, उपकर संकलकाने संकलन केलेल्या व भरणा केलेल्या उपकराचा वार्षिक तपशील विहित नमुन्यात मंडळाकडे पाठविणे आवश्यक होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, संकलन खात्यात भरणा केलेल्या रकमेशी ताळमेळ घेण्यासाठी मंडळाला विहित नमुन्यातील मासिक व वार्षिक तपशील प्राप्त झाले नव्हते. अशा ताळमेळाअभावी, संकलित केलेला संपूर्ण उपकर मंडळाकडे भरणा केला गेला आहे आणि जमा केलेली रक्कम बँक संकलन खात्यात योग्य प्रकारे भरलेली आहे याची मंडळाला सुनिश्चिती करता आली नाही ज्यामुळे बँक खात्यात पैसे न भरण्याचा किंवा चुकीच्या बँक खात्यात भरणा होण्याचा धोका निर्माण झाला.

उत्तरात, शासनाने नमूद केले की, मंडळ उपकर संकलक, निर्धारण अधिकारी आणि अपीलीय अधिकाऱ्यांची संस्था-निहाय यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत आहे आणि मंडळ एक समर्पित इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर संकलन पोर्टल विकसित करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, शासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम आणि स्थानिक संस्थांना संकलित आणि जमा केलेल्या उपकराचा मासिक व वार्षिक अहवाल मंडळाकडे सादर करण्याचे निर्देश जारी केले आहेत आणि उपकर कायद्याच्या कलम 3 आणि उपकर नियमांच्या नियम 5 मधील तरतुदींचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

4.3.4 एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत उपकर संकलन आणि लेखांकन मॉड्यूल

मंडळाने एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी, संचालन आणि देखभालीचे कंत्राट मेसर्स आयटीआय लिमिटेड (भारत सरकारचा उपक्रम) यांना मेसर्स आर्सेस इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने ₹ 88.60 कोटी खर्चाचे कंत्राट दिले (मार्च 2019). कामाच्या व्याप्तीमध्ये इतर गोष्टींबरोबरच कामगार सहाय्यता

केंद्रामध्ये संगणक हार्डवेयर/मनुष्यबळ पुरवणे, कामगारांची नोंदणी, दावे व्यवस्थापन, योजना व्यवस्थापन, उपकर संकलन आणि लेखांकन व वित्तीय मॉड्यूल पुरविणे यांचा समावेश होता.

उपकर संकलन मॉड्यूलमध्ये उपकर संकलन संनियंत्रण व उपकर संकलनाच्या लेखा प्रक्रियेचा मागोवा घेण्यासाठी एकात्मिक पेमेंट गेटवे परिकल्पित केला होता. प्रणालीमध्ये ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे पेमेंट गेटवे इंटिग्रेशनच्या माध्यमातून मंडळाकडे उपकरदात्याने देय असलेल्या उपकराची रक्कम दर्शविणाऱ्या निर्धारण आदेशांचा तपशील अपलोड/अद्ययावत करण्याची तरतूद परिकल्पित केली होती. मंडळाची कार्यक्षमता सुधारण्यासाठी, कंत्राटामध्ये एकात्मिक दुहेरी प्रवीष्टी (डबल एंट्री) वित्तीय लेखा प्रणालीची कल्पना सुद्धा केली होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, कामगारांची नोंदणी, दावे व्यवस्थापन, योजना व्यवस्थापन, व्यवस्थापन माहिती प्रणाली आणि विश्लेषण यासाठीची मॉड्यूल जुलै 2020 पासून कार्यरत होती. तथापि, करारानुसार उपकर संकलन, आणि लेखांकन आणि वित्तीय मॉडयूल्स ऑगस्ट 2019 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असताना अभिकरणाने जुलै 2024 पर्यंत ही मॉडयूल्स विकसित केली नव्हती.

कंत्राटाच्या अटींचे पालन करण्यात अपयशी ठरल्याबद्दल मंडळाने अभिकरणाला कोणतीही कसूरदार नोटीस बजावली नाही किंवा कंत्राटाच्या अटींनुसार दंडही आकारला नाही.

उत्तरात, शासनाने नमूद केले की, मंडळ नवीन अभिकरणामार्फत समर्पित इमारत व बांधकाम कामगार उपकर संकलन पोर्टल विकसित करण्याच्या प्रक्रियेत आहे ज्यासाठी मार्च 2024 मध्ये कार्यादेश जारी करण्यात आले आहेत.

या अनुषंगाने लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी मागवलेल्या निविदेला प्रतिसाद म्हणून तांत्रिक निविदेसह सादर केलेल्या मेसर्स आयटीआय लिमिटेडच्या वार्षिक लेख्यांमध्ये मार्च 2017 पर्यंत ऋण निव्वळ संपत्ती (₹ 866.06 कोटी) दर्शवित होते. अशाप्रकारे, मेसर्स आर्सेस इन्फोटेक लिमिटेड (कंसोर्टियम) सह कंसोर्टियममधील मेसर्स आयटीआय लिमिटेड निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास पात्र नव्हती कारण प्रत्येक निविदाकार किंवा कंसोर्टियमच्या प्रत्येक सदस्याकडे धन निव्वळ संपत्ती असणे आवश्यक होते. मात्र, तांत्रिक मूल्यमापन अहवालात ₹ 866.06 कोटीच्या सकारात्मक निव्वळ संपत्तीऐवजी ₹ 866.06 कोटी निव्वळ संपत्ती दर्शविण्यात आली आणि निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली. निविदा प्रक्रियेनंतर सर्वात कमी बोली लावणाऱ्या कन्सोर्टियमशी करार करण्यात आला. अशाप्रकारे, चुकीच्या तांत्रिक मूल्यमापनाचा परिणाम अपात्र अभिकरणाला आदेश देण्यात झाला. यासंदर्भात शासनाकडून उत्तर प्रतिक्षित होते (डिसेंबर 2024).

निष्कर्ष

बांधकामाचे बिगर-चटई क्षेत्र आणि भूप्रदेश रेखाटन, चालण्याचे मार्ग आदींवर होणारा खर्च उपकर आकारणीसाठी वगळण्यात आल्याने संपूर्ण बांधकाम क्षेत्रावर उपकर आकारला जात नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. निर्धारण अधिकारी बांधकामाच्या अंतिम खर्चावरील उपकराचे निर्धारण, करीत नव्हते. संकलित केलेला उपकर पूर्णपणे मंडळाकडे पाठविला जात नव्हता आणि ताळमेळ प्रणालीअभावी संकलित केलेला संपूर्ण उपकर मंडळाकडे पाठविला जाईल याची सुनिश्चिती मंडळ करू शकले नाही. कंत्राटदाराकडून उपकर संकलन व लेखा व वित्त मॉड्यूल विकसित न केल्याने उपकर संकलन प्रणालीचा योग्य ताळमेळ व व्यवस्थापन यावर परिणाम झाला.

शिफारस 5: शासनाने उपकर आकारणीसाठी एकूण बांधकाम क्षेत्रावरील बांधकामाचा खर्च व बांधकामात होणारा इतर खर्च निश्चित करण्याचे निर्देश जारी करावे.

शिफारस 6: शासनाने संकलित उपकर मंडळाकडे वेळेत पाठविण्यासाठी सर्व उपकर संकलकांना उपकर अधिनियम व उपकर नियमावलीतील तरतुदींचे पालन करण्याचे निर्देश द्यावे.

शिफारस 7: उपकर संकलकाने संकलित केलेल्या आणि मंडळाकडे पाठविलेल्या उपकराचा ताळमेळ सुलभ करण्यासाठी एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत उपकर संकलन मॉड्यूल विकसित आणि कालबद्ध पद्धतीने कार्यान्वित केले जाईल याची सुनिश्चिती करावी.